13-05-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/12/2025 10:43 PM Page 1





# कसोटीतून विराटचा 'विराम'!

## १४ वर्षांच्या उल्लेखनीय कारकिर्दीचा शेवट



**नवी दिल्ली, दि. १२ :**

विराट कोहलीने सोमवार, १२ मे रोजी कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली, ज्यामुळे खेळाच्या सर्वांत प्रदीर्घ स्वरूपातील १४ वर्षांच्या उल्लेखनीय कारकिर्दीचा शेवट झाला. ३६ वर्षीय या खेळाडूने २० जूनपासून हेडिंग्ले, लीड्स येथे सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या भारताच्या पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेपूर्वी ही घोषणा केली. त्याने त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवर एका निवेदनाद्वारे ही बातमी शेअर केली.

कसोटी क्रिकेटमध्ये पहिल्यांदा बॅगी ब्लू रंगाचा खेळ केल्यापासून १४ वर्षे झाली आहेत. प्रामाणिकपणे सांगायचे तर, या स्वरूपाचा प्रवास मला कसा घेऊन जाईल याची मी कधीच कल्पना केली नव्हती. याने माझी परीक्षा घेतली आहे, मला आकार दिला आहे आणि मला आयुष्यभर चालणारे धडे शिकवले आहेत, असे कोहलीने लिहिले.

पांढऱ्या रंगात खेळण्यात काहीतरी खोलवर वैयक्तिक आहे. शांत खेळ, लांब दिवस, छोटे क्षण जे कोणीही पाहत नाही पण ते कायमचे तुमच्यासोबत राहतात.

या फॉरमॅटमधून मी बाहेर पडतोय, ते सोपे नाहीये, पण ते बरोबर वाटते. माझ्याकडे जे काही होते ते मी त्याला दिलं आहे आणि त्यामुळे मला अपेक्षा होती त्यापेक्षा खूप जास्त परत मिळाले आहे, कोहलीने लिहिले.

मी कृतज्ञतेने भरलेल्या मनाने निघून जात आहे. खेळासाठी, मी ज्या लोकांसोबत मैदान शेअर केले त्यांच्यासाठी आणि वाटेत मला ओळख करून देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठी. मी माझ्या कसोटी कारकिर्दीकडे नेहमीच हसतमुखाने पाहेन, कोहली पुढे म्हणाला.

कोहली कसोटी क्रिकेटमध्ये भारताचा चौथा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज म्हणून निवृत्त होत आहे, तो सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड आणि सुनील गावस्कर यांच्यानंतर आहे. २०११ मध्ये भारताच्या एकदिवसीय विश्वचषक विजेत्या संघाचा भाग झाल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांत त्याने जमैकामध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी पदार्पण केले.

जानेवारीमध्ये सिडनी क्रिकेट ग्राउंडवर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या नवीन वर्षाच्या कसोटी सामन्यात त्याने या फॉरमॅटमध्ये शेवटचा सामना खेळला. १२३ कसोटी सामन्यांमध्ये कोहलीने ४६८५ च्या सरासरीने ९२३० धावा केल्या, ज्यामध्ये ३० शतके आणि ३१ अर्धशतके समाविष्ट आहेत. त्याची सर्वोच्च धावसंख्या - नाबाद २५४ - २०१९ मध्ये पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होती.

**टेस्ट क्रिकेटला रामराम म्हणण्याची ३ मोठी कारणे**

३६ वर्षीय विराट कोहलीने १२३ कसोटी सामन्यांमध्ये ९२३० धावा केल्या, ज्यामध्ये त्याने ३० शतके आणि ५१ अर्धशतके केली. वाढत्या वयामुळे कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला. तरुणांना जास्तीत जास्त संधी मिळाव्यात आणि भारतीय संघाला भविष्यातील स्टार खेळाडू मिळावेत जे ही जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडू शकतील अशी कोहलीची इच्छा असेल.

कसोटी क्रिकेटमध्ये काही काळासाठी कोहलीची बॅट शांत दिसत होती. गेल्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात विराट त्याच पद्धतीने वारंवार बाद होत होता. ऑफ स्टंपच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूंवर तो सातत्याने विकेटच्या मागे बाद होत होता. पर्थ कसोटीत कोहलीने नाबाद १०० धावा केल्या असल्या तरी, त्यानंतर त्याला धावा करण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याचे दिसून आले.

२०२४ -२५ च्या बीजीटीमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध टीम इंडियाला १-३ असा पराभव पत्करावा लागला. या मालिकेपूर्वी, भारताला घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत ०-३ असा पराभव पत्करावा लागला होता, ज्यामध्येही कोहलीची बॅट शांत राहिली. किंग कोहलीला तीन सामन्यांमध्ये १०० धावाही करता आल्या नाहीत. अशा परिस्थितीत, कसोटी क्रिकेटमधील त्याच्या कामगिरीत सतत घसरण होत असल्याने, त्याने कसोटीतून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला असावा.

२०११ मध्ये कसोटी पदार्पण करणाऱ्या कोहलीने २०१९ पर्यंत शानदार कामगिरी केली. त्याची फलंदाजीची सरासरी ५४ होती, ज्यामध्ये त्याने २७ शतके केली, परंतु २०२० नंतर त्याचा आलेख घसरू लागला. २०२० पासून, कोहलीने ३९ सामन्यांमध्ये २०२८ धावा केल्या आहेत, ज्यात फक्त ३ शतकांचा समावेश आहे

३६ वर्षीय विराट कोहलीचे ध्येय आता फक्त २०२७ चा एकदिवसीय विश्वचषक खेळणे असेल, ज्यासाठी तो त्याच्या तंदुरुस्तीवर लक्ष केंद्रित करू इच्छितो. २०२७ च्या विश्वचषकावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करण्यासाठी कोहलीला त्याचा कामाचा ताण कमी करायचा आहे.

## १४ वर्षांची भव्य कसोटी कारकिर्द संपली

कसोटी क्रिकेटमध्ये कर्णधार म्हणून विराट कोहलीने सर्वात जास्त शतके झळकावली आहेत. त्याने ६८ कसोटी सामन्यांमध्ये भारताचे नेतृत्व केले आहे. ज्यामध्ये त्याने २० डावात शतक झळकावले आहे. कर्णधार म्हणून सर्वात जास्त कसोटी शतक झळकावणाऱ्या खेळाडूंच्या यादीत विराट पहिल्या क्रमांकावर आहे.

विराट कोहलीने कसोटी फॉरमॅटमध्ये कोणत्याही भारतीय द्वारे सर्वात जास्त डबल शतक झळकावण्याचा कारनामा केला आहे. त्याने १४ वर्षांच्या रेड बॉल करिअरमध्ये ७ बल सेंचुरी झळकावली आहे. त्याचं शेवटचं डबल शतक २०१९ मध्ये दक्षिण आफ्रिका विरुद्ध आलं होतं. सचिन तेंडुलकर आणि वीरेंद्र सेहवाग दोघांनीही कसोटी क्रिकेटमध्ये ६-६ डबल शतक झळकावली आहेत.

विराट कोहलीने सौरव गांगुली, मोहम्मद अझरुद्दीन आणि एम एस धोनीसारख्या कर्णधारांना मागे टाकले आहे. विराट कसोटी क्रिकेटमध्ये भारताचा सर्वश्रेष्ठ यशस्वी कर्णधार ठरला. त्याच्या अंतर्गत टीम इंडियाने ६८ कसोटी सामन्यांमध्ये ४० विजय प्राप्त केले. त्याच्या नेतृत्वात भारताचा विजय ५८.८२% राहिला आहे.

विदेशी कसोटी दौऱ्यावर ४ शतक झळकावणारा विराट कोहली पहिला खेळाडू आहे. त्याने २०१४-१५ मध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर ४ शतक झळकावले होते. याशिवाय २०१६-१७ इंग्लंड मालिकेत सुद्धा त्याने ४ शतकी पारी खेळल्या होत्या. कसोटी क्रिकेटमध्ये विराट कोहली चौथ्या स्थानावर सर्वात जास्त धावा करणारा खेळाडू राहिला. त्याने १२३ कसोटी सामन्यांच्या करिअरमध्ये ९,२३० धावा केल्या. या यादीत त्याच्या वरती फक्त सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड आणि सुनील गावस्कर राहिले आहेत.

## विराटच्या निवृत्तीच्या घोषणेनंतर बीसीसीआयची मोठी प्रतिक्रिया

काही दिवसांपूर्वी विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याची गोष्ट बीसीसीआयला आधीच केली होती. पण बीसीसीआयने त्याला या निर्णयावर विचार करण्याची संधी दिली होती. पुन्हा ही गोष्ट समोर आली की, बीसीसीआय विराटला इंग्लंड दौऱ्यावर कर्णधार पद सोपवणार होते. पण विराटने आज म्हणजेच सोमवार १२ मे रोजी कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे.

विराटने कसोटीतून निवृत्ती घेतल्यानंतर बीसीसीआयची प्रतिक्रिया समोर आली आहे. थँक्यू विराट कोहली. कसोटी क्रिकेटमध्ये एका मोठ्या युगाचा शेवट झाला, पण तुझी खेळी कायमच स्मरणात राहील. टीम इंडियाचा माजी खेळाडू कर्णधार विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. त्याने टीम इंडियासाठी दिलेले योगदान कायमच लक्षात ठेवलं जाईल.

याआधी भारताचा कर्णधार रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. तसेच आता विराटने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. दोघांनी ठीक इंग्लंड दौऱ्याआधी टेस्ट क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. भारतीय संघाला पुढच्या महिन्यात त्याची सुरुवात पासून होईल.

२०११ मध्ये भारतासाठी कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या विराट कोहलीने १२३ कसोटी सामने खेळले आहेत. यादरम्यान त्याने ४६.८५ च्या सरासरीने ९,२३० धावा केल्या आहेत. विराटच्या नावावर ७ डबल शतक, ३० शतक आणि ३१ अर्धशतक आहेत. त्याने ऑस्ट्रेलिया विरुद्ध ३ जानेवारी २०२५ मध्ये शेवटची कसोटी पारी खेळली होती.

## रोहित आणि विराट यांच्या निवृत्तीमागे एकच कारण

**मुंबई, दि. १२ :**

विरीट कोहली आणि रोहित शर्मा यांनी एकामागून एक निवृत्ती जाहीर केली. पण या दोघांच्या निवृत्तीमागे एकच कारण आहे. काही दिवसांपूर्वी गौतम गंभीर यांनी एक वाक्य म्हटले होते. त्यानंतर रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या निवृत्तीचे निर्णय आता समोर आले आहेत.

गौतम गंभीर हे भारतीय संघाचे प्रशिक्षक झाले आणि त्यानंतर त्यांनी बरेच बदल केले आहेत. गौतम गंभीर यांनी आपले नियम भारतीय संघात आणले आणि सर्वांना या नियमाप्रमाणे वागायला लावले. गौतम गंभीर यांच्या एका निर्णयामुळे विराट कोहली आणि रोहित शर्मा यांना आपल्या सुट्ट्या रद्द करत भारतामध्ये खेळवण्यासाठी बोलावले होते. गेले काही दिवस गंभीर यांचे नियम वाढतच चालले होते. गौतम गंभीर यांनी काही दिवसांपूर्वी एक वक्तव्य केले होते आणि त्यानंतर विराट कोहली व रोहित शर्मा यांच्या निवृत्तीच्या बातम्या झळकल्या.




रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्याबाबत गौतम गंभीर यांना एक प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर गंभीर म्हणाले होते की, कोणत्याही खेळाडूने निवृत्ती घ्यावी किंवा नाही, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. कारण एखाद्या खेळाडूला निवृत्ती घ्यायची असेल तर तो घेऊ शकतो, कारण तो त्याचा निर्णय असतो. पण जर भारतीय संघात संधी हवी असेल तर त्यांचा फॉर्म कसा आहे, हे सर्वात महत्वाचे ठरते. पण भारतीय संघात संधी द्यायची की नाही, हे मी ठरवत नाही. निवड समिती ठरवत असते की, कोणाला संघात स्थान द्यायचे की नाही. तुम्ही रोहित आणि विराट यांच्याबाबत विचारत असाल तर ते चांगल्या फॉर्मात असतील तर त्यांना नक्कीच संघात स्थान मिळले, त्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही. गौतम गंभीर यांनी स्पष्ट केले होते की, जे खेळाडू फॉर्मात आहेत, त्यांना नक्कीच संधी मिळेल. सध्या रोहित आणि विराट दोघेही फॉर्मात नाहीत, त्यामुळे त्यांना संधी कशी मिळणार, असे गंभीर यांना सुचवायचे होते, अशी चर्चा सध्या क्रिकेट वर्तुळात सुरु आहे.

रोहित शर्मा आणि त्यानंतर विराट काहली यांनी निवृत्ती घेतली आहे. त्यामागे आता गौतम गंभीर हे एकमेव कारण असल्याचे म्हटले जात आहे. कारण गंभीर संघात आल्यावर या दोघांवर जास्त दडपण वाढले होते आणि आता तर या दोघांनी थेट निवृत्तीच घेतली आहे.

# भारताने महिला एकदिवसीय तिरंगी मालिका जिंकली

## श्रीलंकेचा ९७ धावांनी पराभव | मंधानाचे शतक, स्नेह राणाने घेतल्या ४ विकेट

**कोलंबो, दि. १२ :**

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाने श्रीलंकेच्या मैदानात रंगलेल्या तिरंगी वनडे मालिकेतील अंतिम सामन्यामध्ये यजमान श्रीलंकेला ९७ धावांनी पराभूत करत ट्रॉफी जिंकली आहे. या दोन संघांशिवाय या स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा सहभाग होता. दक्षिण आफ्रिकेचा संघ या स्पर्धेतील चार पैकी १ सामना जिंकत स्पर्धेतून आउट झाला होता.

भारत-श्रीलंका यांच्यातील कोलंबो येथील आर. प्रेमदासा स्टेडियमवर रंगलेल्या फायनल सामन्यात पहिल्यांदा फलंदाजी करताना स्मृती मानधनाच्या शतकी खेळीच्या जोरावर भारतीय संघाने निर्धारित ५० षटकात ३४२ धावांचा डोंगर उभारून लंकेसमोर ३४३ धावांचे टार्गेट सेट केले होते.

या धावांचा पाठलाग करातना श्रीलंका महिला संघ ४८.३ षटकात २४५ धावांत आटोपला. गोलंदाजीत भारताकडून स्नेह राणा हिने सर्वाधिक ४ बळी घेतल्या. तिच्याशिवाय अमनजोत कौरनं ३ विकेट्स आणि नल्लापुरेड्डी श्री चरणी हिने एक विकेट आपल्या खात्यात जमा केली. फायनल लढतीत स्मृती मानधना हिने १०१ चेंडूत ११६ धावांची खेळी करत संघाला दमदार सुरुवात करून दिली. तिच्याशिवाय सलामीची बॅटर प्रतिका रावल ३० (४९), हरलीन देओल ४७ (५६), हरमनप्रीत कौर ४१(३०), जेमिमा रॉड्रिग्ज ४४ (२९) यांनी उपयुक्त खेळी केल्याचे पाहायला मिळाले.



तळाच्या फलंदाजीतल अमजोत कौरनं १२ चेंडूत १८ धावांचे योगदान दिले. दीप्तीनं १४ चेंडूत नाबाद २० धावांची खेळी करत संघाची धावसंख्या ७ बळींच्या मोबदल्यात ३४२ धावांपर्यंत पोहचवली.भारतीय महिला संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकन महिला संघाची सुरुवात खराब झाली. अमनजोत कौर हिने पहिल्याच षटकातील तिसऱ्या चेंडूवर श्रीलंकेची सलामीची बॅटर हसिनी परेरा हिला शून्यावर पॅव्हेलियनचा दाखवला.

विश्मी गुणरत्नेच्या रुपात दुसरा बळीही अमनजोत कौरनेच घेतला.मग स्नेह राणा पिक्चरमध्ये आली. तिने सेट झालेल्या श्रीलंकन कॅप्टन चामरी अट्टापट्टू हिला ५१ धावांवर बाद केले. ४८ धावा करणारी निलक्षीडी सिल्वाही तिच्याच जाळ्यात फसली.अन् श्रीलंकेसाठी सामना अवघड झाला. ठराविक अंतराने भारतीय गोलंदाजांनी यजमानांना धक्क्यावर धक्के देत श्रीलंकेचा डाव २४५ धावांवर आटोपला. फायनल बाजी मारत भारतीय महिला संघाने तिरंगी वनडे मालिकेच्या ट्रॉफीवरआपले नाव कोरले.

# गोवा ज्युनियर राष्ट्रीय कबड्डी संघ 'राष्ट्रीय कबड्डी अजिंक्यपद २०२५' मध्ये सहभागी




साखळी : ज्युनियर राष्ट्रीय कबड्डी अजिंक्यपद २०२५ मध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांसोबत पदाधिकारी.

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. १२ :** हौशी कबड्डी असोसिएशन ऑफ गोवा मुले आणि मुलींचे संघ महाराष्ट्र राज्यातील वर्धा जिल्ह्यातील देओली टाउन येथे होणाऱ्या ज्युनियर राष्ट्रीय कबड्डी अजिंक्यपद २०२५ मध्ये सहभागी होण्यासाठी गोवा रवाना झाले आहेत .ही अजिंक्यपद स्पर्धा कबड्डी असोसिएशन विदर्भ संघाने हौशी कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली आहे.

सोमनाथ एच पाल, सुरेश एम. कानोलकर आणि भानुदास परब गावकर यांच्या मार्गदर्शनाखाली दहा दिवसांच्या प्रशिक्षण शिबिरानंतर गोवा ज्युनियर कबड्डी संघाची निवड करण्यात आली.नारायण झांट्ये कॉलेज ऑफ कॉमर्स, सर्वण, डिचोली येथील क्रीडा संकुलात हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

ज्युनियर राष्ट्रीय कबड्डी अजिंक्यपद स्पर्धा २०२५ मध्ये गोव्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी खालील मुले आणि मुलींची निवड करण्यात आली आहे. रवी कुमार कुडिया (कर्णधार), सोहम मयेकर, राज गावकर, रोहित चव्हाण, विश्वजीत नाईक, पियुष चौधरी, श्रेयश गावस, शिवम कुमार, कृष्णा नूलकर, खजामुद्दीन जांगुंडी, संदीप पेडणेकर (व्यवस्थापक) आणि उमेश चव्हाण (प्रशिक्षक) आणि मुलींच्या संघात स्नेहा जटेपर्णोवर (कर्णधार), आंचल जैस्वार, गंगा चौहान, आरती कुमारी, जमुना चौहान, सावित्री लमाणी, अंजनी निलाजकर, श्रुती गावकर, सानिक्षा गावकर, स्वेता राम, रुथ मलिक, विजयलक्ष्मी शालवती यांचा समावेश आहे. श्रीमती सोहल ख्वाजा (संघ व्यवस्थापक) आणि विष्णुदास डी. परब (प्रशिक्षक) आहेत.

हौशी कबड्डी असोसिएशन ऑफ गोवाचे मुख्य पेट्रोन डॉ. शेखर एस. साळकर,अध्यक्ष सिद्धेश भेंडाळकर, सरचिटणीस अजित सामंत,कोषाध्यक्ष शिवानंद पाल, पंच मंडळाचे अध्यक्ष मन्यु फर्नांडिस उपस्थित होते आणि यावेळी त्यांनी गोवा ज्युनियर कबड्डी संघाला शुभेच्छा दिल्या.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २५० **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 250 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .